# लोकमान्य टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम



१९०५ यावर्षी टिळकांनी वंगभंग चळवळीला पाठिंबा दिला. महाराष्ट्रात टिळकांनी स्वदेशी चळवळ सुरू केली. त्यासाठी त्यांनी चतु:सूत्री जाहीर केली. त्यानुसार स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही चार सूत्रे जाहीर केली. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यात आला.

स्वदेशी वस्तूंचा वापर प्रत्येकाने करावा, असा आग्रह टिळकांनी धरला. प्रत्यक्षपणे ही आर्थिक राष्ट्रवादाची सुरुवात होती.

**१) स्वराज्य –** जहाल मतवादी यांनी स्वराज्य हे अंतिम लक्ष ठरवून त्याच्या प्राप्तीसाठी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या मार्गाचा अवलंब केला. लोकमान्य टिळकांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच'' असा प्रोत्साहन देणारा मंत्र भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील तरुणांना दिला. स्वराज्याशिवाय देशाचा व व्यक्तीचा विकास साधता येणार नाही, असे टिळकांचे प्रामाणिक मत होते. स्वराज्य म्हणजे आपले राज्य. प्रजेच्या प्रतिनिधी मार्फत चालणारे राज्य. ब्रिटिशांच्या राज्यास स्वराज्य कधीच म्हणता येणार नाही, असे टिळकांचे मत होते. कारण राज्यकर्ते परधर्मी व परदेशी आहेत, त्यांचे हितसंबंध त्यांच्या स्वतःच्या देशात गुंतलेले आहेत. स्वराज्याचा प्रजासत्ताक राज्य हा अर्थ त्यांनी लोकांच्या पर्यंत पोहोचवला.

**२) बहिष्कार –** बहिष्कार म्हणजे परदेशी माल खरेदी न करणे. बहिष्काराचा वापर केल्यास परकीय मालाचा खप होणार नाही. त्यामुळे परकीयांची आर्थिक बाजू कमकुवत होईल. स्वदेशी मालाचा वापर केल्यास देशी वस्तूंचा खप वाढेल, परिणामी उद्योगधंदे वाढून देशाची आर्थिक स्थिती सुधारेल. परदेशी सरकारला बळकट करणाऱ्या सर्व गोष्टींवर बहिष्कार टाकावा म्हणजे सरकार वठणीवर येईल, असे टिळकांचे मत होते.

**३) स्वदेशी –** बहिष्कारास पूरक, असे हे राजकीय व आर्थिक साधन आहे. याचा अर्थ परकीय मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी वस्तूचा वापर करणे होय. केवळ परदेशी मालावर बहिष्कार टाकून चालणार नाही तर त्यास पर्याय म्हणून स्वदेशी माल सुद्धा उपलब्ध व्हावयास हवा. म्हणून स्वदेशी वस्तू निर्माण करण्यासाठी देशी लघु व कुटीर उद्योग यांना प्रोत्साहन देण्यात आले .भारतात तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर भारतीयांनी करावा आणि भारता बाहेर जाणाऱ्या पैशांचा ओघ स्वदेशी माल वापरून थांबवावा, ही स्वदेशीची संकल्पना होती. स्वदेशीमुळे खेड्यातील उद्योगधंद्यांना संरक्षण मिळेल व त्यांचा विकास होईल. राजकीय, औद्योगिक, सामाजिक, नैतिक व सांपत्तिक या सर्वच दृष्टीने स्वदेशीची चळवळ आवश्यक आहे, असे टिळकांचे मत होते.

**४) राष्ट्रीय शिक्षण –** ब्रिटिश शिक्षण पद्धती ही सत्वहीन व ध्येय शून्य आहे. ती फक्त कारकून तयार करते, असे टिळकांचे मत होते. भारतातील शिक्षण पद्धती, लॉर्ड मेकॉले यानी सुरू केली होती व ती भारतीयांच्या विचारांशी सुसंगत नव्हती. म्हणून राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी देशभर शाळा, महाविद्यालये उघडण्याची योजना मांडण्यात आली. यातून भारतीय संस्कृतीशी व मूल्यांची सुसंग असे शिक्षण देण्यात यावे असा उद्देश होता. राष्ट्रीय शिक्षणामुळे राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण झाली पाहिजे. स्वतःच्या पायावर उभा राहणारा देशाभिमानी तरुण निर्माण झाला पाहिजे, असे टिळकांचे मत होते. ◆

**विज्ञान वार्ताहर**